# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेब-साईट www.mercindia.org.in


# (प्रारुप) अधिसूचना

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे, जसे की :

**१ संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :**

(१) या विनियमांना, “महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम, २०११,” असे म्हणावे.

(२) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२ विनियम ४.१ मध्ये सुधारणा**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या (ज्यास यापुढे “बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११” असे म्हणण्यात येईल ) विनियम ४.१ मधील परंतुकानंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल, जसे की :-

> “परंतु आणखी असे की, वरील परंतुकाखाली, निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकाच्या वर्गवारीला बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी एकूण महसुली गरज आणि/किंवा वीज दराच्या निश्चितीकरणातून सूट देण्यात आली असेल तर, अशा सर्व प्रकरणी, खालील अटी लागू राहतील:
>
> अ) या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत व्यवसाय आराखडा सादर करावा लागेल;
>
> ब) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५, नुसार एकूण महसुली गरज आणि वीज

दराच्या मंजुरीसाठी वार्षिक याचिका, सूट देण्यात आलेल्या कालावधी दरम्यान, दाखल करण्यात येईल."

**३. विनियम ६४.१.१ मध्ये सुधारणा**

बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ च्या विनियम ६४.१.१ मधील परंतुकानंतर, खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल, जसे की:-

"परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकाखाली बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत विशिष्ट कालावधीसाठी पारेषण परवानाधारकास एकूण महसुली गरज निश्चित करण्यातून सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट दिलेल्या कालावधीसाठी, वरील परंतुक लागू राहणार नाही."

**४ विनियम ६४.२.१ मध्ये सुधारणा**

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.२.१ मधील तिस-या परंतुकानंतर खालील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

" परंतु आणखी असे की, या विनियमांच्या विनियम ४.१ च्या पहिल्या परंतुकानुसार जर पारेषण परवानाधारकाची एकूण महसुली गरज निश्चित करण्यातून बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीखाली विशिष्ट कालावधीकरिता सूट देण्यात आली असेल तर, अशी सूट दिल्याच्या कालावधीच्या दरम्यान, सर्व दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांकरिता बेस पारेषण क्षमता हक्कांचे निश्चितीकरण, अशी सूट देण्यापूर्वीच्या मागील १२ महिन्यात प्रचलित असलेल्या दीर्घ-कालीन पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या कोइन्सिडंट सर्वोच्च मागणी (सीपीडी) आणि कोइन्सिडंट नसलेल्या सर्वोच्च मागणीच्या (एनसीपीडी)च्या मासिक सरासरीच्या आधारे, करण्यात येईल."

**५ विनियम ६४.३.१ मध्ये सुधारणा**

(एक) बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.३.१ मधील दुस-या परंतुकामधील "किंवा यंत्रणेमध्ये नवीन पारेषण परवानाधारकांची भर पडल्यामुळे" हे शब्द वगळण्यात येतील आणि ते १ एप्रिल, २०११ पासून वगळण्यात आले आहेत, असे मानण्यात येईल.

(दोन) बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ६४.३.१ मधील वरील सुधारीत दुस-या परंतुकानंतर खालील परंतुक जादा

दाखल करण्यात येईल :-

“परंतु आणखी असे की, नियंत्रण कालावधी दरम्यान जर नवीन पारेषण परवानाधारकांची राज्यांतर्गत पारेषण जाळ्यामध्ये भर घालण्यात आली तर, विनियम ६४.२ आणि ६४.३ मध्ये संदर्भ करण्यात आलेले बेस पारेषण क्षमता हक्क आणि बेस पारेषण दर हे नियंत्रण कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता निश्चित करण्यात येतील.”

**६ नवीन विनियम १०२ समाविष्ट करणे**

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ मध्ये, विनियम १०१ नंतर खालील विनियम जादा दाखल करण्यात येईल :-

**“१०२. तात्पुरत्या ( ट्रॅन्झिटरी ) तरतुदी :**

या विनियमांमध्ये काहीही विरुध्द नमूद करण्यात आले असले तरी -

(अ) ३१ मार्च, २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी आयोगाने निर्गमित केलेले वीज दर अंमलात राहतील.

आणि

(ब) व्यवसाय आराखडा आणि १ एप्रिल, २०११ पासून आर्थिक वर्ष २०१५-१६, म्हणजेच ३१ मार्च, २०१६ पर्यंत या विनियमाखाली समाविष्ट असलेल्या सर्व प्रकरणांतील एकूण महसुली गरज, वीज दरापासूनचा अंदाजित महसूल आणि वीज दराच्या निश्चितीकरणासाठीचे आकार, यांची परिगणना करण्यासाठी याचिका, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ खाली दाखल करणे व हाताळणे चालू राहील.

परंतु असे की, विनियम ४.१ खाली सूट देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला असेल तर, संबंधित निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक वार्षिक महसुली गरज आणि वीज दराच्या मान्यतेसाठी याचिका, सूट देण्यात आलेल्या कालावधीदरम्यान, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ खाली दाखल करतील.

परंतु आणखी असे की, विनियम ४.१ खाली जर निर्मिती कंपनी किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारकासाठी सूट देण्याचा आदेश नसेल तर आणि या विनियमाखाली १ एप्रिल, २०११

पासून वीज दराचे निश्चितीकरण अंमलात आणण्यात अडचण असल्याबाबत जर आयोगाचे समाधान झाले तर आणि या विनियमांखाली १ एप्रिल, २०१२ पासून किंवा कोणत्याही पुढील कालावधीपासून वीज दराची निश्चिती करणे आवश्यक झाल्यास, सदर वीज दराच्या निश्चितीकरणासंबंधी रद्द करण्यात आलेले विनियम अंमलात राहतील आणि १ एप्रिल, २०१२ पर्यंतच्या कालावधीसाठी किंवा अशा पुढील कालावधीसाठी वीज दराच्या निश्चितीकरणाकरिता या विनियमांतील तरतुदी लागू राहणार नाहीत.”

(के. एन. खवारे)
सचिव, मविनिआ

**टिपणी :** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११, दि. ४ फेब्रुवारी, २०११ रोजी शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात आले आहेत.

दिनांक : ११ ऑगस्ट, २०११

ठिकाण : मुंबई